संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# आचारसंहितेचे अक्षम्य धिंडवडे

**निवडणुकांच्या** प्रचार काळामध्ये राजकीय पुढाऱ्यांच्या तोंडाचा दांडपट्टा असा काही सुटतो की त्याला काही सीमा राहात नाही. आपण काय बोलत आहोत याचे त्यांना अजिबात भान नाही. तरीदेखील निवडणूक आयोगाने या वाचाळवीरांना आवरण्यासाठी आचारसंहितेची व्यवस्था केली आहे. परंतु आचारसंहितेचेदेखील या नेत्यांकडून जेव्हा धिंडवडे काढले जातात तेव्हा यांना लोकशाहीची किंवा तिच्या मूल्यांची किती चाड आहे हे लक्षात येते. निवडणुकीचा पहिला टप्पा पूर्ण होत असताना उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि बहुजन समाज पार्टीच्या नेत्या मायावती यांना निवडणूक आयोगाने ७२ आणि ४० मार्कांची प्रचारबंदी लागू केली. कारण योगी आदित्यनाथ यांनी दोन समाजामध्ये तेढ निर्माण होईल अशा प्रकारची वक्तव्ये केली होती तर मायावतींनी त्याच पध्दतीचे जातीयवादी विधान करून विषमतेला प्रोत्साहन देणारे विधान केले. एकीकडे निवडणूक आयोगाने या दोन वरिष्ठ नेत्यांचे कान उपटले असताना दुसरीकडे समाजवादी पार्टीचे ते स्वयंभू नेते आझम खान यांनीसुध्दा जयाप्रदा यांच्याविषयी आक्षेपार्ह विधान केले त्याचा देशभरातून निषेध झाला. त्यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हाही दाखल झालेला आहे. त्याच उत्तर प्रदेशात मनेका गांधी यांनी मुस्लिमांच्या विरोधात विधान करून मतांच्या मोबदल्यात सवलती दिल्या जातात आणि मागितल्या जातात. असे विचित्र विधान करून आपल्या राजकीय अपरिपक्वतेचेच प्रदर्शन केले. राहुल गांधींनी तर सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाचा आपल्या मनाप्रमाणे विपर्यास केला. जे आदेश किंवा विधाने न्यायालयाने केली नाही. ती न्यायाधीशांच्या तोंडी घालून राजकीय सवंगपणा दाखवण्याचा प्रयत्न केला. आता सर्वोच्च न्यायालयाने राहुल गांधींनाही नोटीस पाठवली आहे. अशा या सवंग विधानांमधून पंतप्रधान नरेंद्र मोदीही सुटलेले नाहीत. त्यांनी थेट लष्करालाच निवडणुकांच्या रिंगणात ओढून जवानांच्या हौतात्म्याचेही राजकारण करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. आपल्या महाराष्ट्रातील नेतेदेखील असा तोंडाचा दांडपट्टा वापरण्यात मागे राहिलेले नाहीत. मग कायदा गेला खड्ड्यात आचारसंहितेचे काय करायचे ते करून घेऊ अशी बेजबाबदार विधाने शिवसेना नेत्यांकडून झाली. तर प्रकाश आंबेडकरांनी निवडणूक आयोगाला जेलमध्ये टाकण्याची भाषा केली होती. अशी अनेक उदाहरणे एकापाठोपाठ देता येतील.

### लोकशाहीला खड्ड्यात घालणारे नेते

आपण या लोकशाहीच्या मोठमोठ्या गप्पा मारत असतो. त्या लोकशाहीला ते बटिक बनवून निवडणुकीतला राजकीय स्वार्थ साधण्याची राजकारण्यांची ही प्रवृत्ती अतिशय धोकादायक वाटू लागते. विशेष म्हणजे पंतप्रधानांसारख्या व्यक्तीने मतांचा जोगवा मागताना जबाबदारीचे भान ठेवू नये हे आणखीनच आश्चर्यकारक ठरते. योगी आदित्यनाथसारख्या मुख्यमंत्री पदावरच्या व्यक्तीला नोटीस पाठवण्याची वेळ येते. यावरून राजकीय नेते किती बेजबाबदारपणा दाखवतात हे सर्वसामान्य जनतेच्याही लक्षात येते. भारतीय जनता पार्टी साधनशुचिता किंवा सभ्यतेच्या बऱ्याच गप्पा मारते. परंतु अतिउत्साह आणि वास्तवतेचे भान सुटले की मोठे नेतेदेखील स्वतःबरोबर पक्षाचीही पंचाईत करून ठेवतात. आझम खान यांच्याबद्दल फारसे बोलायचे कारण नाही कारण ते आतापर्यंत अशा चित्रविचित्र विधानांसाठी प्रसिध्द आहेत. मात्र त्यांच्या या विधानांमुळे संपूर्ण समाजवादी पार्टीलाही त्याचा त्रास सहन करावा लागतो. राजकारण जरूर करावे. निवडणुकीच्या काळात प्रचाराचे तापमान वाढलेले असते हेही खरे आहे. म्हणजे याचा अर्थ आपल्याला वाटेल ते बरळल्याची परवानगी मिळाली आहे असा त्याचा अर्थ करून घेता कामा नये. हीच परिस्थिती जर सतत कायम राहाणार असेल तर निवडणूक प्रचारात कडक कायदे करण्याची वेळ येईल कारण निवडणूक आयोगाने आचारसंहितेच्या माध्यमातून प्रचारातील सभ्यता टिकून राहावी असा प्रयत्न केला. मात्र त्या सभ्यतेलाही आपण पात्र नसल्याचा निर्वाळा या राजकीय नेत्यांनी केला आहे. विशेष म्हणजे जनतेला गृहित धरून किंवा कायदे नियम यांची कोणतीही तमा न बाळगता या प्रकारचा व्यवहार राजकारण्यांकडून केला जातो. तो सर्वात दुर्दैवी म्हणावा लागतो. त्याउलट आचारसंहितेचा सन्मान करीत अनेक सामाजिक सभ्यतेचा विचार करीत जर प्रचार केला गेला. तर तो अधिक आदर्शवत ठरू शकतो.

### नियमांची मोडतोड

कायद्याला खड्ड्यात घालणारे लोकसभेत जाऊन कायदा बनवणारे म्हणून मिरवणार असतील तर कोण कोणाला खड्ड्यात घालत आहे हेही स्पष्ट होते. निवडणूक जिंकण्यापुरता अशा पध्दतीचा प्रचार केला जातो. पण यामुळे सगळे राजकीय पक्ष एकत्र येऊन लोकशाहीला मत दिले पाहिजे. असे म्हणण्याशिवाय पर्याय उरत नाही. एकूणच आचारसंहितेच्या ज्या पध्दतीने चिंधड्या उडवल्या जात आहेत त्या उडवून आम्ही कोणत्याही नियमाला बांधलेले नाही किंवा कोणताही कायदा अथवा नियम आम्ही आमच्या मनाप्रमाणे मोडू शकतो. त्याचा आम्हाला कोणीही जाब विचारता कामा नये. निवडणुकीमधून राजकारण्यांच्या याच बेजबाबदारपणाचे जनतेलाही अनुभव येतात. आणि आपले राजकीय नेते काय पात्रतेचे आहेत. हेही त्यानिमित्ताने जनतेला कळून चुकते. थोडक्यात सांगायचे तर आचारसंहितेची ही मोडतोड करण्याची ही प्रवृत्ती धोकादायक आहे हे सिध्द होते. भविष्यकाळात यापेक्षाही कडक कायदे किंवा नियम पाळावे लागतील केवळ ७२ तासाची किंवा चाळीस तासाची प्रचारबंदी करून भागणार नाही तर त्यांना निवडणूक भरवण्यालाच बंदी घालण्यासारखे उपाय करावे लागतील. जगातल्या सर्वात मोठ्या लोकशाहीचे गुणगान करीत असताना तिची मूल्यव्यवस्था टिकवून ठेवण्याची जबाबदारी ही मंडळी घेताना दिसत नाहीत. एकटा निवडणूक आयोग किंवा सामान्य जनतेने याबाबत कितीही दक्षता बाळगली तरी ती पुरेशी ठरणारी नाही. सामान्य जनतेसाठी ज्या पध्दतीचे नियम काटेकोरपणे लागू केले जातात. त्याच पध्दतीचे नियम राजकीय नेत्यांना लागू करण्याची वेळ आली आहे. अगदी वेळ पडली तर त्या त्या राजकीय पक्षाची मान्यता सिध्द केली पाहिजे.